महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक
गट/सर्व्हे नं.१५६०/१ आडगांव शिवार,
न्यु इंग्लिश स्कुल जवळ, मुंबई आग्रारोड,
नाशिक — ४२२००३

Maharashtra State
Secondary & Higher Secondary Education,
Nashik Divisional Board, Nashik
Gat/Sr.No.1560/1 Adgaon shivar,
New English School, Mumbai-Agra Road,
Nashik – 422003

Website-sscboardnashik.com
Email-nsksec@rediffmail.com, sschodnskdb@gmail.com

**परीक्षा प्राधान्य/महत्वाचे**

क्र. नाविमं/माध्य./ब—२/330
नाशिक — ४२२ ००३.
दिनांक — 10/०६/२०२१

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक विदयालये,
नाशिक, धुळे, जळगांव व नंदुरबार जिल्हे.

**विषय :— शैक्षणिक वर्ष २०२०—२१ साठी माध्यमिक शालान्त (इ.१०वी) प्रमाणपत्र साठी मूल्यमापन कार्यपध्दतीबाबत.**

संदर्भ :— १.शासन निर्णय क्र.परीक्षा ०५२१/प्र.क्र.४३/एसडी—२, दि.२८/५/२०२१.
२.क्र.रा.मं./परीक्षा—२/३३७२ पुणे दिनांक—९/६/२०२१.
३. परिपत्रक क्र.रा.मं./परीक्षा—२/३३७१ पुणे दिनांक—९/६/२०२१.

उपरोक्त संदर्भिय पत्रास व विषयांस अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, सन २०२०—२१ या शैक्षणिक वर्षासाठी शासनाच्या दि.२८/५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) साठी मूल्यमापन कार्यपध्दती जाहीर केलेली आहे.

त्या अनुषंगाने सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार मंडळामार्फत मूल्यमापन प्रक्रिया पुर्ण करण्याचा तपशील, सूचना व वेळापत्रक मंडळामार्फत निश्चित करण्यात आलेले असून त्याची कार्यपध्दती तयार करण्यात आलेली आहे. त्यामध्ये सन. २०२०—२१ या शैक्षणिक वर्षात मंडळामार्फत आयोजित करण्यात आलेल्या इ.१० वीच्या परीक्षेसाठी मंडळाकडे नोंदणी केलेल्या नियमित, पुनर्परिक्षार्थी, नांव नोंदणी केलेले खाजगी विदयार्थी, तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणारे परिक्षार्थी तसेच श्रेणी सुधार योजनेअंतर्गत प्रविष्ठ विदयार्थी यांचे मूल्यमापनाबाबतचा तपशिल व विषयनिहाय परिशिष्टे यांबाबतचे परिपत्रक या पत्रासोबत जोडलेले असून मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

तरी, सदर मूल्यमापन प्रक्रिया पूर्ण करण्याचा तपशिल, सूचना, मूल्यमापनाबाबतचे विषय निहाय नमुने व वेळापत्रक इ. बाबतचे परिपत्रक व परिशिष्टे याची सर्व माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापक व शिक्षक यांनी नोंद घेवून आवश्यक कार्यवाही करावी. तसेच शासन निर्णय व उपरोक्त परिपत्रकानुसार इ.१० वी च्या मूल्यमापन कार्यपध्दती संदर्भात प्रशिक्षणाचा व्हिडीओ मंडळाच्या यु—टयुब चॅनलवर http://mh-ssc.ac.in/faq या लिंकवर दि.१०/६/२०२१ रोजी स.११.०० पासून उपलब्ध करून दिलेला आहे.

तरी, सर्व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक व संबंधित शिक्षक यांनी त्यानुसार प्रशिक्षण घेवून कार्यवाही करावी. तसेच सदरचे परिपत्रक आपल्या स्तरावरून संबंधित विदयार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

विभागीय सचिव(करीता)
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक — ४२२ ००३.

सोबत— १.संदर्भ क्र.३ चे परिपत्रक (पृष्ठे १ ते १०)
२.परिशिष्टे

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.

परिपत्रक क्र.रा.मं./परीक्षा-२/3369 दि.०९/०६/२०२१

**विषय - शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) साठी मूल्यमापन कार्यपध्दतीबाबत..**

संदर्भ -१. शासन निर्णय क्रमांक - परीक्षा ०५२१/प्र.क्र.३९/एसडी-२, दि.१२ मे २०२१

२. शासन निर्णय क्रमांक - परीक्षा ०५२१/प्र.क्र.४३/एसडी-२, दि.२८ मे २०२१

कोविड -१९ च्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत आयोजित करण्यात येणारी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये रद्द करण्यात आलेली आहे. सदर परीक्षा रद्द केल्यामुळे, परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांना गुणपत्रक/प्रमाणपत्र देण्याबाबत स्वतंत्रपणे निर्देश निर्गमित करण्यात येतील, असेही उपरोक्त शासन निर्णयाद्वारे स्पष्ट करण्यात आले होते. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) साठी मूल्यमापन कार्यपध्दतीचा तपशील जाहीर केलेला आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक शाळांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात मंडळामार्फत आयोजित करण्यात आलेल्या इयत्ता १० वी च्या परीक्षेसाठी मंडळाकडे नोंदणी केलेल्या नियमित, पुंनर्परिक्षार्थी, नाव नोंदणी केलेले खाजगी विद्यार्थी, तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे परिक्षार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअतंर्गत प्रविष्ट विद्यार्थी यांचे मूल्यमापनाबाबत उपरोक्त संदर्भ क्र.२ मधील शासन निर्णयातील तरतूदी लक्षात घेऊन पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णयातील दिलेल्या निर्देशानुसार मंडळामार्फत मूल्यमापन प्रक्रियेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

**१. कार्यवाहीचे वेळापत्रक-**

सदर शासन निर्णय व मंडळाने या परिपत्रकाद्वारे तसेच वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांद्वारे दिलेली कार्यपध्दती व सूचना याबाबत पुढील वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी.

| अ.क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १. | मुख्याध्यापक व शिक्षक यांचेसाठी मूल्यमापन कार्यपध्दतीबाबत मंडळाच्या यु-टयुब चॅनेलवरुन प्रशिक्षण | दि.१०/०६/२०२१ (स.११.०० ते दु.०१.००) |
| २. | अपवादात्मक परिस्थितीत कोणत्याही प्रकारचे मूल्यमापन न झालेल्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करणे | दि.११/०६/२०२१ ते दि.२०/०६/२०२१ |
| ३. | विषय शिक्षकांनी विषयनिहाय गुणतक्ते वर्ग शिक्षकांकडे सादर करणे. | |
| ४. | वर्ग शिक्षकांनी संकलित निकाल अंतिम करुन निकाल शाळेच्या निकाल समितीकडे सादर करणे. | |
| ५. | वर्ग शिक्षकांनी तयार केलेल्या निकालाचे निकाल समितीने परीक्षण व नियमन करून प्रमाणित करणे. | दि.१२/०६/२०२१ ते दि.२४/०६/२०२१ |
| ६. | मुख्याध्यापकांनी निकाल समितीने प्रमाणित केलेल्या निकालानुसार विद्यार्थ्यांचे विषयनिहाय गुण मंडळाच्या संगणकीय प्रणालीमध्ये भरणे. | दि.२१/०६/२०२१ ते दि.३०/०६/२०२१ |
| ७. | मुख्याध्यापकांनी निकाल समितीने प्रमाणित केलेले विद्यार्थ्यांचे निकाल व अनुषंगिक स्वाक्षरी प्रपत्रे सिलबंद पाकीटात विभागीय मंडळात जमा करणे. (विभागीय मंडळाच्या नियोजनानुसार) | दि.२५/०६/२०२१ ते दि.३०/०६/२०२१ |
| ८. | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा निकालाबाबत विभागीय मंडळ व राज्यमंडळ स्तरावरील प्रक्रिया | दि.०३/०७/२०२१ पासून |

२. निकाल समिती गठीत करणे–

- माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांनी शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे कमाल ०७ सदस्यांची निकाल समिती गठीत करण्यात आली असेलच, नसल्यास तात्काळ गठीत करावी.
- समितीने बैठक घेऊन मंडळाच्या कार्यवाहीच्या वेळापत्रकाप्रमाणे समितीच्या कामकाजाची रुपरेषा ठरवावी.
- समितीने शाळेतील इ.१० वी ला अध्यापन केलेल्या सर्व विषय शिक्षकांची व वर्ग शिक्षकांची बैठक घेऊन शासन निर्णयातील तरतूदीनुसार मूल्यमापनाची कार्यपध्दती स्पष्ट करावी. तसेच सर्व शंकांचे निरसन करावे व वेळोवेळी मार्गदर्शन करावे.
- वर्ग शिक्षकांनी तयार केलेल्या विद्यार्थीनिहाय संकलित निकालाचे परीक्षण व नियमन समितीमार्फत करण्यात यावे.
- समितीने शासन निर्णयातील निकषानुसार निकालाचे परीक्षण व नियमन अभिलेख/कागदपत्रांच्या आधारे करुन विद्यार्थ्यांचे विषयनिहाय गुण अचूक असल्याची खात्री करुन निकाल स्वाक्षरीसह दोन प्रतीत प्रमाणित करावा.
- समितीने प्रमाणित केलेला निकाल संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे सुपूर्त करावा.

३. मुख्याध्यापकांनी करावयाची कार्यवाही–

अ. इयत्ता १०वीचे विषय शिक्षक, वर्ग शिक्षक व पर्यवेक्षक यंत्रणा यांची बैठक घेऊन शासन निर्णयाचे प्रकट वाचन करावे. त्यातील निकष व कार्यपध्दती समजून घेऊन सर्वंकष चर्चा करावी व सर्व शंकांचे निरसन करावे.

ब. मंडळाने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार प्रत्येक टप्प्याचे कामकाज वेळेत पूर्ण करावे.

क. मंडळाकडे परीक्षेसाठी आवेदनपत्रे भरुन नोंदणी केलेल्या व मंडळाचे बैठक क्रमांक प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांचेंच मूल्यमापन करण्यात यावे.

ड. नियमित विद्यार्थ्यांप्रमाणेच पुनर्परिक्षार्थी, खाजगी विद्यार्थी (संपर्क केंद्रामधील), तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे विद्यार्थी यांच्याबाबतीत संबंधित विषय शिक्षक व वर्ग शिक्षक यांच्याकडून मूल्यमापनाबाबत कार्यवाही करुन घेण्यात यावी.

इ. समितीने प्रमाणित केलेला निकाल मंडळाने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार संगणक प्रणालीमध्ये नोंदवावा.

उ. नियमित विद्यार्थ्यांच्या बाबतीत समितीने प्रमाणित केलेल्या इ.१०वीच्या संकलित निकालाची एक मूळ प्रत आणि इ.९वीच्या संकलित निकालाची एक मूळ प्रत सिलबंद पाकीटात मुख्याध्यापकांच्या अभिरक्षेत ठेवून दुसरी प्रत (इ.९वी व इ.१०वी) संबंधित विभागीय मंडळाकडे निर्धारित कालावधीत जमा करावी.

खाजगी विद्यार्थ्यांच्या बाबतीत त्याने यापूर्वी इयत्ता ५वी ते ९वी यापैकी ज्या इयत्तेची अंतिम परीक्षा पूर्ण केली असेल त्या परीक्षेच्या अंतिम निकालाची प्रमाणित प्रत उपरोक्तप्रमाणे विभागीय मंडळास सादर करावी.

४. निकाल तयार करण्यासाठी कार्यपध्दती-

अ. नियमित विद्यार्थ्यांसाठी-

- इ.९वीचा अंतिम निकाल, इ.१०वीच्या वर्षभरातील अंतर्गत लेखी मूल्यमापन व इ.१०वीचे अंतिम तोंडी/प्रात्यक्षिक/अंतर्गत मूल्यमापन इत्यादींच्या आधारे विद्यार्थ्यांना विषयनिहाय गुणदान करण्यात यावे. सदर गुणदान करताना शासन निर्णयातील सर्व तरतूदींचे काटेकोर पालन करण्यात यावे.
- इयत्ता ९वी च्या अंतिम निकालातील विषयनिहाय १०० पैकी प्राप्त गुणांचे शाळा स्तरावर ५० टक्के गुणांत रुपांतर करताना अपूर्णांकात आलेले गुण पुढील पूर्ण गुणात रुपांतरीत करावेत.(उदा.१३.००=१३, १३.०१=१४, १३.५०=१४, १३.५१=१४)

## इ.९ वी मध्ये प्राप्त अंतिम गुणांच्या रुपांतराबाबत नमूना उदाहरणे

| अ.क्र. | विषय | पैकी गुण | प्राप्त गुण | ५० पैकी रुपांतरीत गुण (पूर्णांकांत) |
|---|---|---|---|---|
| ०१ | १.प्रथम/द्वितीय/तृतीय भाषा | १०० | ६८ | १) ६८÷२ = ३४ गुण |
| | | | ७७ | २) ७७÷२ = ३८.५ = ३९ गुण |
| ०२ | संयुक्त भाषा | ५०+५०=१०० | २६+२४= ५० | १) २६÷२=१३ व २४÷२=१२<br>१३+१२=२५ गुण |
| | | | २३+२२= ४५ | २) २३÷२=११.५ = १२ व २२÷२=११<br>१२+११=२३ गुण |
| | | | २१+२५ = ४६ | ३) २१÷२=१०.५=११ व २५÷२=१२.५= १३<br>११+१३=२४ गुण |
| ०३ | १. गणित<br>२. विज्ञान आणि तंत्रज्ञान<br>३. सामाजिक शास्त्रे<br>४. दिव्यांग विद्यार्थ्यांना लागू असलेले विषय | ५०+५०=१०० | गणित, विज्ञान आणि तंत्रज्ञान व सामाजिक शास्त्रे तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना लागू असलेल्या विषयांबाबत उपरोक्त क्र.२ मधील उदाहरणांप्रमाणे कार्यवाही करावी. | |
| ०४ | पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम (NSQF) अंतर्गत विषय | १०० | ८२ | १) ८२÷२ = ४१<br>२) ६७÷२ = ३३.५= ३४ |
| ०५ | सवलतीच्या गुणांसह उत्तीर्ण झालेल्या विषयांबाबत | १००<br>(एक पेपरचा विषय) | २८+०७(ग्रेस)= ३५ | १) ३५ गुण विचारात घेऊन ३५÷२= १७.५= १८ |
| | | ५०+५०=१००<br>(दोन पेपरचे विषय) | १३+१२+१०(ग्रेस) = ३५ | २) सवलतीचे गुण समान विभागून रुपांतर करावे.<br>१३+०५(ग्रेस) = १८, १८÷२= ०९<br>१२+०५ (ग्रेस) = १७, १७÷२ = ८.५ = ०९<br>म्हणजेच ९+९= १८ |
| | | ५०+५०=१००<br>(दोन पेपरचे विषय) | १४+१२+०९(ग्रेस) = ३५ | ३) सवलतीचे गुण समान विभागून दिल्यानंतर जादा सवलतीचा गुण पहिल्या विभागाला देवून रुपांतर करावे.<br>१४+०५(ग्रेस) = १९, १९÷२= ९.५ = १०<br>१२+०४ (ग्रेस) = १६, १६÷२ = ०८<br>म्हणजेच १०+०८ = १८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०६ | एकत्रित गुणांच्या सवलतीदवारे भाषा तसेच गणित व विज्ञान विषयात उत्तीर्ण झालेल्या विषयांबाबत (३५ पेक्षा कमी गुण असलेल्या विषयात एकत्रित गुणांच्या सवलतीदवारे उत्तीर्णता दिली असल्यास त्या विषयास प्रत्यक्ष प्राप्त झालेले गुण विचारात घेऊन रुपांतर करावे.) | भाषा विषयांबाबत १००+१००+१०० | २५+४५+३५= १०५ | १) प्रथम भाषा- २५÷२= १२.५ = १३<br>२) द्वितीय भाषा- ४५÷२ = २२.५ = २३<br>३) तृतीय भाषा- ३५÷२ = १७.५ = १८ |
| | | गणित व विज्ञान विषयात १००+१०० | २८+४२= ७० | १) गणित - २८÷२ = १४<br>२) विज्ञान- ४२÷२ = २१ |

- मंडळाच्या संगणक प्रणालीमध्ये इयत्ता ९वीचे विषयनिहाय १००/५०+५० पैकी प्राप्त गुणच भरावेत. सदर गुणांचे संगणकीय प्रणालीमध्ये वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे ५०/२५+२५ पैकी गुणांमध्ये आपोआप रुपांतरीत करण्याची तरतूद केलेली आहे.
- **पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम (NSQF)-**
  पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम (NSQF)अंतर्गत विषयासाठी इ.९वी मध्ये १०० पैकी प्राप्त झालेल्या गुणांचे ५० पैकी गुणांमध्ये रुपांतर करण्यात यावे. तसेच इ.१० वीच्या वर्षभरातील अंतर्गत लेखी मूल्यमापनासाठी प्राप्त गुणांचे ३० गुणात रुपांतर करावे. अशाप्रकारे ८० पैकी प्राप्त गुणांचे अंतिम निकालासाठी लेखी परीक्षेतंर्गत ३० गुणात रुपांतर करावे. सदर ३० पैकी प्राप्त गुण व इ.१०वी मध्ये अंतिम प्रात्यक्षिकसाठी ७० (२०+५०) पैकी प्राप्त झालेले गुण विचारात घेवून १०० पैकी गुणांचे निश्चितीकरण करावे.
- इ.१०वी मध्ये प्रथम सत्र परीक्षा किंवा सराव परीक्षा यातील एक किंवा दोन्ही परीक्षा घेतलेली असल्यास शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे गुणांची नोंद करण्यात यावी व त्याचे ३० पैकी गुणात रुपांतर करावे.

अ. विद्यार्थ्याने प्रथम सत्र परीक्षा, सराव परीक्षा यामधील एकच परीक्षा दिली असल्यास त्या परीक्षेतील विषयनिहाय ८० गुणांपैकी प्राप्त झालेल्या गुणांचे ३० पैकी गुणात रुपांतर करावे. अपूर्णांकात आलेले गुण पुढील पूर्ण गुणात रुपांतरीत करावेत.(उदा.१३.००=१३, १३.०१=१४, १३.५०=१४, १३.५१=१४)

उदा.

| अ.क्र. | विषय | लेखी परीक्षेसाठी निर्धारित गुण | प्राप्त गुण लेखी पैकी | | रुपांतरासाठी विचारात घ्यावयाचे गुण | ३०/१५+१५ पैकी गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रथम सत्र (८०/४०+४० पैकी प्राप्त गुण) | सराव परीक्षा (८०/४०+४० पैकी प्राप्त गुण) | | |
| ०१ | मराठी प्रथम भाषा | ८० | ------ | ६६ | ६६ | २४.७५=२५ |
| ०२ | गणित | ४०+४० | ३२+३३ | ---- | ३२+३३ | १२.००+१२.३७<br>१२+१३ |

ब. विद्यार्थ्याने प्रथम सत्र परीक्षा, सराव परीक्षा या दोन्ही परीक्षा दिल्या असल्यास सदर दोन परीक्षांपैकी सर्वोत्तम एकूण गुण असलेल्या एका परीक्षेचे विषयनिहाय प्राप्त गुण विचारात घेऊन त्यात ८० गुणांचे ३० पैकी गुणात रुपांतर करण्यात यावे. अपूर्णांकात आलेले गुण पुढील पूर्ण गुणात रुपांतरीत करावेत.(उदा.१३.००=१३, १३.०१=१४, १३.५०=१४, १३.५१=१४)

उदा.

| अ.क्र. | विषय | लेखी परीक्षेसाठी निर्धारित गुण | प्राप्त गुण लेखी पैकी | | रुपांतरासाठी विचारात घ्यावयाचे गुण | ३०/१५+१५ पैकी गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रथम सत्र (८०/४०+४० पैकी प्राप्त गुण) | सराव परीक्षा (८०/४०+४० पैकी प्राप्त गुण) | | |
| ०१ | इंग्रजी प्रथम भाषा | ८० | ५६ | ७२ | ७२ | २७.००=२७ |
| ०२ | विज्ञान आणि तंत्रज्ञान | ४०+४० | २८+३२ = ६० | २९+२६ = ५५ | २८+३२ = ६० | १०.५०+१२.०० ११+१२ |

क. अपवादात्मक परिस्थितीमध्ये माध्यमिक शाळेमध्ये प्रथम सत्र परीक्षा व सराव परीक्षा या दोन्ही परीक्षांचे आयोजन करणे शक्य झाले नाही अशा शाळांनी वर्षभरात इ.१०वीच्या अभ्यासक्रमावर आयोजित केलेल्या सराव चाचण्या, स्वाध्याय, गृहकार्य, प्रकल्प यापैकी एक किंवा अधिक कार्याला विद्यार्थ्याला विषयनिहाय प्राप्त झालेल्या एकूण गुणांचे ३० पैकी गुणात रुपांतर करावे. अपूर्णांकात आलेले गुण पुढील पूर्ण गुणात रुपांतरीत करावेत.(उदा.१३.००=१३, १३.०१=१४, १३.५०=१४, १३.५१=१४)

उदा.

| अ. क्र. | विषय | लेखी परीक्षेसाठी निर्धारित गुण | प्राप्त गुण लेखी पैकी | | सराव चाचण्या, स्वाध्याय, गृहकार्य, प्रकल्प यापैकी एक किंवा अधिक कार्याला प्राप्त गुण/ पैकी | ३०/१५+१५ पैकी गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रथम सत्र (८०/४०+४० पैकी प्राप्त गुण) | सराव परीक्षा (८०/४०+४० पैकी प्राप्त गुण) | | |
| ०१ | हिंदी | ८० | --- | --- | १५/२० | २२.५०=२३/३० |
| ०२ | मराठी | ८० | --- | --- | ४८/६० | २४/३० |
| ०३ | गणित | ४०+४० | --- | --- | १६/२०+१९/२० | १२.००+१४.२५ १२/१५+१५/१५ |
| ०४ | सामाजिक शास्त्रे | ४०+४० | --- | --- | ३२/४०+२९/४० | १२.००+१०.८७ १२/१५+११/१५ |

टिप-उपरोक्त अ किंवा ब प्रमाणे गुण उपलब्ध असल्यास क प्रमाणे गुणदान करू नये.

- राज्य मंडळाच्या व अन्य मंडळाच्या विद्यार्थ्यांबाबत इ.१० वी मध्ये प्रविष्ट झालेल्या विषयांपैकी एक किंवा अधिक विषय इ.९ वी मध्ये घेतलेले नसल्यास अशा विषयांसाठी इ.९ वी मध्ये घेतलेल्या अन्य विषयांची सरासरी विचारात घेऊन १०० पैकी गुण निश्चित करावेत व ते अशा एक किंवा अधिक विषयांना देऊन पुढील कार्यवाही करावी.
- शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे शाळांनी इ.९वी चे सरल प्रणालीमध्ये नमूद केलेल्या विद्यार्थीनिहाय वार्षिक निकालांशी गुणांची पडताळणी करण्यात येणार असल्याने उपरोक्त गुणदान वस्तुनिष्ठ पध्दतीने करावे.
- प्रथम भाषा, द्वितीय भाषा/संयुक्त भाषा, तृतीय भाषा,गणित, विज्ञान आणि तंत्रज्ञान, सामाजिक शास्त्रे, पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम (NSQF) अंतर्गत विषय (लागू असल्यास), दिव्यांग विद्यार्थ्यांच्या विषय योजनेतील अन्य विषय तसेच श्रेणी विषय यासाठी विषय व विद्यार्थीनिहाय स्वतंत्र गुणदान करावे. विषय शिक्षकांनी सदर गुणांची/श्रेणींची नोंद **परिशिष्ट -१.०१ ते १.१०** (विषयनिहाय लागू होणारे परिशिष्ट) मधील नमुन्यात दोन प्रतीत करावी व त्याच्या स्वाक्षरीत प्रती वर्गशिक्षकांकडे देण्यात याव्या.
- विषय शिक्षकांकडून प्राप्त झालेल्या विषयनिहाय गुणांचे/श्रेणींचे विद्यार्थीनिहाय संकलन वर्ग शिक्षकांमार्फत दोन प्रतीत करण्यात यावे. त्यासाठी विहित नमुन्यातील **परिशिष्ट - आर ०१ ते आर ०५** (विषय योजनेनुसार लागू होणारे परिशिष्ट) वापरावे. सदर संकलित निकाल वर्गशिक्षकांनी स्वाक्षरीत करुन मुख्याध्यापकांकडे जमा करावा.
- **वरील माहिती दिलेल्या सूचनांनुसार मंडळाच्या संगणक प्रणालीमध्ये भरण्यात यावी.**

शाळेचा संकलित निकाल तयार करताना परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांचे विषयनिहाय प्राप्त गुण नोंदवावे. सवलतीचे गुण, कला आणि क्रीडा सवलतीचे गुण नोंदविण्यात येऊ नयेत, याबाबतची कार्यवाही मंडळस्तरावर करण्यात येईल.

## ब. पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी-

### (i) काही विषयांसाठी प्रविष्ट पुनर्परीक्षार्थी-(नियमित व खाजगी पुनर्परीक्षार्थी)

- सदर विद्यार्थ्यांच्या बाबतीत मूल्यमापन करताना यापूर्वीच्या मंडळाच्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विषयांच्या लेखी परीक्षेतील प्राप्त गुणांचे सरासरीने ८० पैकी गुणांत रुपांतर मंडळाच्या संगणक प्रणाली मार्फत करण्यात येईल. आणि ते गुण प्रविष्ट झालेल्या प्रत्येक विषयाच्या लेखी परीक्षेसाठी देण्यात येतील.

  सन २०२०-२१ मध्ये ज्या विषयासाठी पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाला असेल त्या विद्यार्थ्याचे इ.१०वीचे अंतिम तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा/अंतर्गत मूल्यमापन यामध्ये विषयनिहाय प्राप्त झालेले २० पैकी गुण देण्यात येतील.
- श्रेणी विषयामध्ये अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांची विषयनिहाय श्रेणी निश्चित करावी.
- यासाठी **परिशिष्ट-२.०१** मधील नमुन्यात प्रत्येक विद्यार्थ्यांची यापूर्वी उत्तीर्ण केलेल्या विषयांच्या परीक्षेचे वर्ष, महिना आणि बैठक क्रमांक (विषयनिहाय) इ. तपशील भरावा.

- नियमित पुनर्परीक्षार्थ्याच्या बाबतीत विद्यार्थ्यास इ.९ वीमध्ये प्राप्त झालेल्या एकूण गुणांची टक्केवारी आणि खाजगी पुनर्परीक्षार्थ्यांच्या बाबतीत यापूर्वीच्या अंतिम इयत्तेत (इ.५वी ते इ.९वी) मध्ये प्राप्त झालेल्या एकूण गुणांची टक्केवारी.

**वरील माहिती दिलेल्या सूचनांनुसार मंडळाच्या संगणक प्रणालीमध्ये भरण्यात यावी.**

(ii) **श्रेणी विषयांव्यतिरिक्त एकाही विषयांत उत्तीर्ण न झालेले पुनर्परीक्षार्थी– (नियमित व खाजगी पुनर्परीक्षार्थी)**

- शासन निर्णयातील तरतूदीनुसार राज्य मंडळाच्या यापूर्वीच्या परीक्षांमध्ये एकाही विषयात उत्तीर्ण न झालेल्या पुनर्परीक्षार्थ्यांच्या बाबतीत सराव चाचण्या, स्वाध्याय, गृहकार्य, प्रकल्प यापैकी एक किंवा अधिक बाबींच्या आधारे केलेल्या मूल्यमापनास विषयनिहाय ८० पैकी गुणदान करण्यात यावे.
- सन २०२०-२१ मध्ये इ.१०वी परीक्षेस अंतिम तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा/अंतर्गत मूल्यमापन यामध्ये विद्यार्थ्यास विषयनिहाय प्राप्त झालेले २० पैकी गुण निश्चित करावे..
- नियमित पुनर्परीक्षार्थ्याच्या बाबतीत विद्यार्थ्यास इ.९ वीमध्ये प्राप्त झालेल्या एकूण गुणांची टक्केवारी आणि खाजगी पुनर्परीक्षार्थ्यांच्या बाबतीत यापूर्वीच्या अंतिम इयत्तेत (इ.५वी ते इ.९वी) मध्ये प्राप्त झालेल्या एकूण गुणांची टक्केवारी.
- उपरोक्त माहिती **परिशिष्ट– २.०२** मधील नमुन्यात भरुन संबंधितांनी प्रमाणित करावी. तसेच सदर माहिती मंडळाच्या संगणक प्रणालीमध्ये भरण्यात यावी.

(iii) **श्रेणी विषयासह एकाही विषयांत उत्तीर्ण न झालेले पुनर्परीक्षार्थी– (नियमित व खाजगी पुनर्परीक्षार्थी)**

श्रेणी विषयासह एकाही विषयांमध्ये उत्तीर्ण न झालेल्या पुनर्परीक्षार्थ्यासाठी उपरोक्त (ii) प्रमाणे कार्यवाही करावी. तसेच विद्यार्थ्याची माहिती **परिशिष्ट– २.०२** मधील नमुन्यात भरुन संबंधितांनी प्रमाणित करावी. तसेच सदर माहिती मंडळाच्या संगणक प्रणालीमध्ये भरण्यात यावी.

उपरोक्तप्रमाणे विद्यार्थीनिहाय संकलन वर्ग शिक्षकांनी दोन प्रतीत तयार करुन स्वाक्षरीसह मुख्याध्यापकांकडे जमा करावे.

क. खाजगी विद्यार्थ्यांसाठी (नियमित)-

- संपर्क केंद्रामार्फत संपर्क शिबिरामध्ये अथवा अन्य कालावधीत आयोजित केलेल्या सराव चाचण्या, पूर्ण केलेल्या स्वाध्याय पुस्तिका, गृहकार्य, प्रकल्प यापैकी एक वा अधिक बाबींसाठी विषयनिहाय प्राप्त झालेल्या गुणांचे ८० पैकी गुणात रुपांतर करावे.

उदा.

| अ. क्र. | विषय | लेखी परीक्षेसाठी निर्धारित गुण | संपर्क केंद्रामार्फत आयोजित सराव चाचण्या, पूर्ण केलेल्या स्वाध्याय पुस्तिका,गृहकार्य, प्रकल्प यापैकी एक वा अधिक बाबींसाठी प्राप्त झालेले गुण | रुपांतरीत गुण ८०/४०+४० पैकी गुण |
|---|---|---|---|---|
| ०१ | हिंदी | ८० | ४०/८० | ४०/८० |
| ०२ | मराठी | ८० | २०/५० | ३२/८० |
| ०३ | गणित | ४०+४० (i+ii) | ०८/२०+०६/२० | १६/४०+१२/४० |

- इ.१०वीच्या अंतिम तोंडी/प्रात्यक्षिक/अंतर्गत मूल्यमापन इत्यादींच्या आधारे २० पैकी प्राप्त होणारे गुण नोंदविण्यात यावे.
- खाजगी विद्यार्थ्याने यापूर्वी उत्तीर्ण केलेल्या अंतिम परीक्षेमध्ये (इ.५वी ते इ.९वी यापैकी अंतिम) प्राप्त झालेल्या एकूण गुणांची टक्केवारी/श्रेणी नोंदविण्यात यावी.
- प्रथम भाषा, द्वितीय भाषा/संयुक्त भाषा, तृतीय भाषा,गणित, विज्ञान आणि तंत्रज्ञान, सामाजिक शास्त्रे, दिव्यांग विद्यार्थ्यांच्या विषय योजनेतील अन्य विषय तसेच श्रेणी विषय यासाठी विषय व विद्यार्थीनिहाय स्वतंत्र गुणदान करावे. विषय शिक्षकांनी सदर गुणांची/श्रेणींची नोंद **परिशिष्ट – ३.०१ ते ३.०९** (विषयनिहाय लागू होणारे परिशिष्ट) मधील नमुन्यात दोन प्रतीत करावी व त्याच्या स्वाक्षरीत प्रती वर्गशिक्षकांकडे देण्यात याव्या.
- विषय शिक्षकांकडून प्राप्त झालेल्या विषयनिहाय गुणांचे/श्रेणींचे विद्यार्थीनिहाय संकलन वर्ग शिक्षकांमार्फत दोन प्रतीत करण्यात यावे. त्यासाठी विहित नमुन्यातील **परिशिष्ट – पी ०१ ते पी ०४** (विषय योजनेनुसार लागू होणारे परिशिष्ट) वापरावे. सदर संकलित निकाल वर्गशिक्षकांनी स्वाक्षरीत करुन मुख्याध्यापकांकडे जमा करावा.
- उपरोक्त माहिती मंडळाच्या संगणक प्रणालीमध्ये भरण्यात यावी.

ड. तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे विद्यार्थी-

- राज्य मंडळ व अन्य मंडळाच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत मूल्यमापन करताना यापूर्वीच्या मंडळाच्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या परीक्षेचा विषयनिहाय तपशील व प्राप्त झालेले गुण/श्रेणींची नोंद **परिशिष्ट -४.०१** मध्ये करण्यात यावी.
- यापूर्वीच्या मंडळाच्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विषयांच्या लेखी परीक्षेतील प्राप्त गुणांचे सरासरीने ८० पैकी गुणांत रुपांतर मंडळाच्या संगणक प्रणाली मार्फत करण्यात येऊन सदरचे गुण प्रविष्ट तुरळक विषयांच्या लेखी परीक्षेसाठी देण्यात येतील. मंडळाच्या संगणक प्रणाली मार्फत करण्यात येईल. आणि ते गुण प्रविष्ट झालेल्या प्रत्येक विषयाच्या लेखी परीक्षेसाठी देण्यात येतील.

- सन २०२०-२१ मध्ये ज्या तुरळक विषयांसाठी विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाला असेल त्या विद्यार्थ्याचे इ.१०वीचे अंतिम तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा/अंतर्गत मूल्यमापन यामध्ये विषयनिहाय प्राप्त झालेले २० पैकी गुण देण्यात येतील.
- उपरोक्तप्रमाणे विद्यार्थीनिहाय संकलन वर्ग शिक्षकांनी दोन प्रतीत तयार करुन स्वाक्षरीसह मुख्याध्यापकांकडे जमा करावे.

**इ.श्रेणीसुधार योजनेतंर्गत प्रविष्ट विद्यार्थी-**

- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा सन २०२१ साठी प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे तसेच मंडळाच्या प्रचलित तरतूदीनुसार श्रेणीसुधार योजनेतंर्गत पुढील परीक्षेमध्ये संधी असल्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे या परीक्षेचे निकाल तयार करण्यात येणार नाहीत.

**उपरोक्त अ, ब, क, व ड बाबत संगणक प्रणालीमध्ये माहिती भरताना पुढील बाबी विचारात घ्याव्यात.**

१. **विद्यार्थ्याने मंडळाकडे परीक्षेचे आवेदनपत्र सादर करताना नमूद केलेले विषय, यापूर्वीच्या परीक्षेत विषयात मिळालेली सूट याबाबत नमूद केलेला तपशील संगणकीय प्रणालीमध्ये दिसेल.**

२. **सदर तपशीलातील विषयात अथवा विषयातील सूट यामध्ये बदल असल्यास गुणांच्या सर्व रकान्यामध्ये MM असे दर्शवावे.**

३. **उपरोक्तप्रमाणे बदलेल्या विषयाचे गुण व इतर तपशील संबंधित विषयाच्या व संकलित निकालाच्या परिशिष्टांमध्ये दर्शवावेत.**

**उपरोक्तप्रमाणे अ ते इ प्रमाणे माहिती विहित प्रपत्रामध्ये विभागीय मंडळाकडे जमा केल्यानंतर व मंडळाच्या संगणकीय प्रणालीमध्ये भरल्यानंतर त्यामध्ये शाळांना कोणताही बदल करता येणार नाही. त्यामुळे शाळांनी विविध परिशिष्टामध्ये तसेच संगणकीय प्रणालीमध्ये माहिती भरतांना आवश्यक ती दक्षता घ्यावी.**

**५. अभिलेख जतन करणे व अभिलेखांची पडताळणी-**

शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे इयत्ता ९ वीच्या वार्षिक मूल्यमापनाचे अभिलेख व इ.१०वीच्या अंतर्गत मूल्यमापनाचे संदर्भातील सर्व अभिलेख, उत्तरपत्रिका व तत्सम बाबी निकाल समितीच्या पडताळणीनंतर सिलबंद स्वरुपात जतन करण्यात याव्यात. व ते तपासणी/पडताळणीसाठी विभागीय मंडळ, शालेय शिक्षण विभागातील क्षेत्रीय अधिकारी/तपासणी पथके यांना मागणीनुसार उपलब्ध करुन देण्यात यावेत.

**६. कार्यपध्दतीचे उल्लंघन करणाऱ्या शाळांच्या बाबत कारवाई-**

सदर शासन निर्णय व मंडळाने या परिपत्रकाद्वारे तसेच वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाद्वारे दिलेली कार्यपध्दती व सूचनांचे उल्लंघन, कसूर करणाऱ्या, अभिलेखांमध्ये गैरप्रकार करणाऱ्या शाळा/व्यक्ती/समितीचे घटक शासन निर्णयात नमूद केलेल्या कार्यवाही/कारवाईस पात्र असतील.

**७. गुणपडताळणी/उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती मिळणे/पुनर्मूल्यांकन-**

शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे गुणपडताळणी,उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती मिळणे,पुनर्मूल्यांकन या सुविधा सदर परीक्षेसाठी कोणत्याही स्तरावर उपलब्ध नसतील.

उपरोक्तप्रमाणे नियमित, पुनर्परिक्षार्थी, खाजगी व तूरळक विषय घेवून प्रविष्ट होणारे विद्यार्थी इत्यादींसाठी आवश्यक असणारी खालील परिशिष्टे मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | तपशील | परिशिष्टे |
|---|---|---|
| ०१ | नियमित विद्यार्थी (विषयनिहाय) | १.०१ ते १.१० |
| ०२ | पुनर्परीक्षार्थी (विद्यार्थीनिहाय) | २.०१ ते २.०२ |
| ०३ | खाजगी विद्यार्थी (विषयनिहाय) | ३.०१ ते ३.०९ |
| ०४ | तुरळक विषय घेऊन प्रविष्ट झालेले विद्यार्थी(विद्यार्थीनिहाय) | ४.०१ |
| ०५ | संकलित निकाल तक्ते (नियमित विद्यार्थी) | आर ०१ ते आर ०५ |
| ०६ | संकलित निकाल तक्ते (खाजगी विद्यार्थी ) | पी ०१ ते पी ०४ |

निकाल समितीने निकालाचे परीक्षण व नियमन करुन निकाल अंतिम केल्यानंतर उपरोक्त परिशिष्टातील माहिती भरुन स्वाक्षरीत व प्रमाणित केलेली मूळ परिशिष्टे (विषयनिहाय निकाल, संकलित निकाल, विद्यार्थीनिहाय तपशील इ.) इ.९ वीच्या निकालपत्रकाची प्रमाणित छायाप्रत तसेच इ. ५वी ते ९वी (लागू असल्याप्रमाणे) गुणपत्रक/निकालपत्रकाची प्रमाणित छायाप्रत सिलबंद स्वरुपात संबंधित विभागीय मंडळाकडे जमा करावीत.

शासन निर्णयानुसार निश्चित केलेली कार्यपध्दती विचारात घेऊन उपरोक्त प्रक्रियेद्वारे मंडळाच्या संगणकीय प्रणालीद्वारे प्राप्त होणारे गुण, विविध परिशिष्टांमध्ये विभागीय मंडळाकडे सिलबंद स्वरुपात प्राप्त होणारा गुणांचा तपशील व इ. ५वी ते ९वी (लागू असल्याप्रमाणे) विचारात घेऊन विद्यार्थ्यांच्या विषयनिहाय गुणांची निश्चिती करण्यात येईल. शासनाच्या व मंडळाच्या धोरणानुसार तसेच तरतूदीनुसार देय असलेल्या अन्य गुणांचा लाभ प्रचलित पध्दतीनुसार देण्यात येईल. तद्नंतर मंडळाचे उत्तीर्णबाबतचे सर्व निकष विचारात घेऊन निकाल जाहीर करुन विद्यार्थ्यांना गुणपत्रक व प्रमाणपत्र देण्यात येईल.

(डॉ. अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ, पुणे ०४.